

म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. २७७२

# माझ्या कविता

अनिल कांबळे

REFBK-0023856
REFBK-0023856

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२४७२
दा. क्र. 23८५६
काव्य गद्य ८३
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

संदर्भ काव्य

# माझ्या कविता.

अनिल कांबळे

मेनका प्रकाशन

मेनका प्रकाशन : ३१२

आवृत्ती पहिली : एप्रिल १९८३

© प्रेरणा कांबळे
७०७ शुक्रवार पेठ, पुणे–४११००२

मुखपृष्ठ : जयंत जोशी

अर्पणपत्रिकेवरील रेखाचित्रे : विवेक सबनीस

रेखाटने : अनिल कांबळे

मुद्रक व प्रकाशक :
पुरुषोत्तम विष्णु बेहेरे
मेनका प्रकाशन,
५६० नारायण, पुणे–४११०३०

मुद्रणस्थळ :
मेनका मुद्रणालय,
५६० नारायण, पुणे–४११०३०

**मूल्य दहा रुपये**

या पुस्तकाच्या प्रकाशनार्थ महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाच्या नवलेखक अनुदान योजनेखाली अनुदान मिळाले आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
2762
दा. क्र. 23856
ग्रंथ शाखा (स्थल प्रत)

REFBK-0023856
REFBK-0023856

कविवर्य सुरेश भट
व प्रसिद्ध उर्दू शायर
साहिर लुधियानवी
यांना सविनय अर्पण !

"जरी ह्या वर्तमानाला कळेना आमुची भाषा
विजा घेऊन येणाऱ्या पिढ्यांशी बोलतो आम्ही !"

– सुरेश भट



"माना कि इस जमीं को न गुलजार कर सके
कुछ खार कम तो कर गये, गुजरे जिधरसे हम!"

–साहिर लुधियानवी



मध्यंतरी तिचं एक पत्र आलं....

“ आजकाल, तू नियमितपणे भेटतोस
तुझ्या कवितेतून
माझ्याही आत
खोल कुठेतरी
एक वेदना दरवळून येते
तुझे
वेदनांनी गहिंवरलेले पारदर्शी शब्द वाचताना ! ”

माझ्या
कविता.
अनिल कांबळे

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२७७२
दा. क्र. २३८५६
काव्य जाधव
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

## कल्पना

तू अबोल झालिस तेव्हा
मी दिला शब्द कवितेला,
तो शब्द आजवर माझे
आयुष्य सावरित गेला

त्या पाऊसओल्या वेळी
तू मिठीत घेता मजला
मी हळूच डोळ्यांमधला
पाऊस मोकळा केला

कोवळ्या स्वप्नरंगांची
तू जरी भुलावण केली
जपले मी हृदयापाशी
आजन्म तुझ्या प्रतिमेला

आरसा तुझ्या प्रेमाचा
तू घेऊन गेल्यावरती
मी माझ्यापासून माझा
चेहरा दूरवर नेला

हृदयास आज कवितेच्या
येतात गुलाबी हाका
पाहून तुझ्या प्रेमाचा
हुंदका मला फुटलेला



## आसपास

विचारले हळूच एकदा फुलास मी
" ऋतूत कोणत्या दिला तुला सुवास मी ?"
कशास आर्जवे तटावरून चालली ?
कधीच घेतले मिठीत वादळास मी
कधीच मी तुझ्या खुणा पुसून टाकल्या
असाच ठेवतो जपून आसवांस मी
जरी दिवाच मालवून टाकलास तू
दिले तुझे हळूच पेटवून श्वास मी
कितीक लावले नवीन चेहरे तरी
अजून हाय ! नापसंत आरशास मी
कधी तुला चुकून आठवेन ज्या क्षणी
पुकार तू मला, असेन आसपास मी

## ऐनवेळी

जवळ येता तुझ्या दूर सरतेस तू
ऐनवेळी अशी काय करतेस तू ?॥

वेढणारा मला
पूर हा कोणता ?
उंच लाटेतला
सूर हा कोणता ?

प्रश्न करता तुला मौन धरतेस तू
ऐनवेळी अशी काय करतेस तू ?॥

लाजते पालवी
रोमरोमातली
ये लपेटून घे
आग देहातली

दूर कोठेतरी काय बघतेस तू ?
ऐनवेळी अशी काय करतेस तू ?॥

मोकळा होऊनी
स्पर्श माझ्यातला
जन्म कुठलातरी
मागताना तुला

याच जन्मी कशी हाय ! विरतेस तू ?
ऐनवेळी अशी काय करतेस तू ?॥

## परिणाम

कोमेजल्या फुलांचे रस्ते मला म्हणाले–
" आकाश वेदनांचे आम्हास का मिळाले ? "

स्वप्नांत काल माझ्या मी पाहिले असे की–
माणूस माणसाला आवाज देत आहे

आले न ऐनवेळी कोणीच सोबतीला
नसते कुणी कुणाचे तेव्हां मला कळाले !

मी एकटाच माझ्या नादात जात होतो
वाटेत भेटणारे माझ्यासवे निघाले

माझ्या न बोलण्याचा परिणाम एवढा की–
खोटेपणास त्यांच्या सौंदर्य प्राप्त झाले

## स्वप्नरंग

रोज माझ्या मनाला असे वाटते
सांजवारा लपेटून यावेस तू
तारकांचे दिवे मंद झाल्यावरी
कोवळे उन्ह गोळा करावेस तू ॥

घेऊनी मोगऱ्याचा सुगंधीपणा
बंद दारातुनी आत यावी हवा
दरवळू लागता शेज माझी तुझी
देह व्हावा तुझा लाजरा ताटवा

मी धरू पाहता हात गोरा तुझा
अंग चोरून मागे सरावेस तू ॥

चंद्रमा पाहताना झरोक्यातला
तारकांच्या उठाव्या कळा अंतरी
अंग येता शहारून माझे तुझे
पालवावे नवे स्पर्श देहावरी

मोकळ्या होत जाता तुझ्या पाकळ्या
बाहुपाशात माझ्या शिरावेस तू ॥

टपटपू लागता यौवनाची फुले
मी टिपावे तुला तू टिपावे मला
आपुल्या रेशमी हालचालीमुळे
जन्म यावा प्रकाशून देहातला

स्वप्नरंगात दोघे भिजू लागता
तेवणारे दिवे मालवावेस तू ॥

# दंगा

मी असा तुटल्या पतंगासारखा
पंख नसलेल्या विहंगासारखा

त्या तुझ्या माझ्या क्षणांचा आजही–
चालतो हृदयात दंगा सारखा

ये पुन्हां उसळून माझ्या अंतरी
काल रात्रीच्या प्रसंगासारखा

धावणाऱ्या आंधळ्या गर्दीत ह्या
मी उभा आहे अपंगासारखा

का असा आलास माझ्या जीवनी ?
विरून जाणाऱ्या तरंगासारखा

लाभलेला जन्म हा माझा मला
वाटतो आहे तुरुंगासारखा

मी लिहावा शब्द एखादा तरी
संत लोकांच्या अभंगासारखा





## हलकेच

हलकेच आज माझ्या जवळून कोण गेले ?
हलकेच काळजाला कवळून कोण गेले ?

डोळे मिटून हलके लाजून हासताना
स्वप्नें नव्या सुखाची सजवून कोण गेले ?

येताच ओळखीची संकेत शीळ कानी
रानात पाखरांना चुकवून कोण गेले ?

अजुनी पहावयाला खिडकीत चंद्र येतो
कोन्यातल्या दिव्याला विझवून कोण गेले ?

मी सांगणार नाही सांगू नकोस तूही
वाटा परस्परांच्या बदलून कोण गेले ?

आले दुरून जेव्हा स्वर कोवळ्या उन्हाचे
शेजेवरी फुलांना विसरून कोण गेले ?

अस्वस्थ अक्षरांच्या गर्दीत हिंडताना
कवितेस ओळ माझ्या सुचवून कोण गेले ?

## चाफा

घेतले ओळखून तू न मला
ये पुन्हा नीट घे बघून मला

सांग ना नाव तू तुझे आता
का अशी लाजशी अजून मला ?

मी कधी वाचले मला नाही
मी जरी घेतले लिहून मला !

मीच आधार जाहलो माझा
चालतो मीच सावरून मला

मी कळेना जिथे मला अजुनी
काय उपयोग तू कळून मला

मी तुझ्या अंगणातला चाफा
घे पहाटेस तू खुडून मला

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
2862
दा. क. 23656
काव्य मधाळ3
ग्रंथ राजा (स्थळ प्रत)

## अंदाज

सोबत्यांनी बांधला अंदाज आहे
मी असा नव्हतो कधी जो आज आहे

चूक माझ्या हातुनी झाली अशी की–
आज मी माझ्यावरी नाराज आहे

सारखा शब्दातुनी नादावणारा
मी तुझ्या गाण्यातला स्वरसाज आहे

ऐकला होतास जो एकांतवेळी
तोच मी हृदयातला आवाज आहे

## तुझ्या बाहूत मी जेव्हा....

दिवे देहात स्पर्शाचे जळाया लागले होते
तुझ्या बाहूत मी जेव्हा ढळाया लागले होते

मला तू सांगण्याआधी तुला मी सांगण्याआधी
मनातिल एकमेकांना कळाया लागले होते

मनाच्या खोल गाभारी सुखाची हाक येताना
तुझ्याशी रेशमी नाते जुळाया लागले होते

दवांने चिंब झालेल्या कळीचे फूल होताना
मला आकाश स्वप्नांचे मिळाया लागले होते

## दूर चांदण्यात रे....

दूर चांदण्यात रे पहाट मंद हासली
जाऊ दे अता मला धुक्यात वाट गुंतली ॥

पाकळ्या फुलून गंध भोवताली दाटला
गंध दाटता पहाटवायु मंद जागला
लाजरी जुई मनातल्या मनात लाजली ॥

गर्द रान रे दंवात चिवचिव जाहले
रंगल्या दिशेकडे पहाटपक्षी चालले
दूर राऊळातुनी समेस तार लागली ॥

दान हे दिलेस तू तुझ्यात जीव गुंतला
अंतरातुनी तुझाच रूपगंध जागला
कोवळ्या उन्हात सावली हळूच हासली ॥



## बाजार

त्या कोवळ्या फुलांचा बाजार पाहिला मी
पैशात भावनेचा व्यापार पाहिला मी

अंधार वेदनांनी आक्रंदतो तरीही
नजरेत वासनेचा शृंगार पाहिला मी

बाहेर सभ्यतेचे गातात गोडवे जे
वेश्यागृहात त्यांचा दरबार पाहिला मी

रस्ते उन्हात न्हाले सगळीकडे परंतू
वस्तीतुनी दिव्यांच्या अंधार पाहिला मी

थोडा उजेड ज्याला मागावयास गेलो
तो सूर्यही जरासा लाचार पाहिला मी

पोटामधील खळगी भरण्यास रोज येथे
प्रत्येक माणसाला बेजार पाहिला मी

## हिरवे गाणे

वेड्या आभाळाची माया
हिरव्या रंगात फुलावी
रानपाखरांची गाणी
पानापानात सांडावी

हिरवे गाणे रानोमाळ
स्वच्छ आभाळ हसावे
गर्द जांभळ्या उन्हात
मोरपिसारे फुलावे

लाख नक्षत्रांचे नभ
रिक्त ओंजळीत यावे
अश्रू डोळ्यांत थांबुनी
हासू ओठांत फुटावे

वेड्या आकाशाप्रमाणे
रिती करावी ओंजळ
हिरवे गाणे घेऊनिया
पुन्हा वाकावे आभाळ



## हाक

ही कुणाची हाक आता माझिया कानी पडे ?
चेहरा कुठल्या क्षणाचा मागते माझ्याकडे !

जे जसे आहे तसे असणार हे कळते तुला
का तरीही नाव माझे सारखे ओठी अडे ?

जेथुनी गेले ऋतूंचे काफिले केव्हातरी
आजही वळतात माझे पाय त्या वाटेकडे

वाचताना गीत माझे एकदा कळले मला
आजच्या गीतात माझ्या कालचा मी सापडे

## प्रवेश

तू अशी आज पहाटेस घरी आल्याने
बंद ओठांत नवे गीत सुखाचे आले
गंध घेऊन पुन्हा लाख युगांचे अपुले
रूप बदलून जसे रंग फुलांचे आले

हे असे आज पहाटेस तुझ्या येण्याने
अंगणातील भिजे देह खुळया जाईचा
तू शहारून तुझा हात पुढे करताना
आसमंतास सुटे कंप नव्या नवतीचा

गार वाऱ्यात लपेटून तुला घेताना
खोल प्राणात किती जन्म बुडाले माझे
एकमेकांस नवा रूपरंग देताना
अंतरंगास तुझ्या, रंग मिळाले माझे

स्वप्नदेशात असे स्वैरपणे फिरताना
कोवळी हाक नभातून कुणाची आली ?
तू पहाटेस तुझा श्वास मला देताना
का अशी सांग तुला हूल उन्हाची आली ?

## पाऊस

पाऊस असा घनघोर
नदीला पूर
किनारे बुडले
झेलीत कंच पाऊस
कुणी हे श्वास
वहरूनी खुडले

पाऊस असा घनघोर
तरी अनिवार
चेतले गात्र
काजळी स्वैर वाऱ्यात
रक्त लाटेत
उतरली रात्र

पाऊस असा घनघोर
मनी अलवार
फुले ही गाती
रानात कुणाला स्वैर
निळे वनमोर
लागले हाती

पाऊस असा घनघोर
कुणी हळुवार
लोचने मिटली
लाजून चंद्रस्वप्नात
गौर वक्षात
पांखरे नटली



## काळजी

सैल झालेल्या त्वचेला सारखा बघतोस का ?
संपलेल्या यौवनाची काळजी करतोस का ?

तू स्वताच्या अस्मितेला दे जरा चेतावणी
संपुनी गेल्याप्रमाणे तू असा जगतोस का ?

सांडले केव्हाच माझ्या ओंजळीतील चांदणे
हा रिकामा हात आता व्यर्थ तू धरतोस का ?

सोसली कित्येकदा गहिऱ्या व्यथेची वादळे
मंद झुळकीने जराशा मात्र तू हलतोस का ?

मी तुला विसरून गेले हे खरे असले तरी
वेदना होऊन माझ्या अंतरी सलतोस का ?

## मागणे

अंधारल्या जीवनात
नवा प्रकाश झरू दे
कोंदटल्या अंतरात
वारा मोकळा फिरू दे ।

दिशाहीन धावणाऱ्या
सावल्यांच्या प्रदेशात
ओळखीचा वाटणारा
एक चेहरा दिसू दे ।

रोज आसवांच्या सवे
ज्यांचा दिवस संपतो
चार आनंदाचे क्षण
त्यांच्या वांटयास येऊ दे ।

माझे इतकेच आहे
तुझ्या पायाशी मागणे
रोज अक्षर फुलांनी
माझी ओंजळ भरू दे ।

मानभावी सांत्वनांची
मला नकोत कौतुके
साध्यासुध्या माणसांचा
मला आधार मिळू दे ।



## अजिबात

एकदाही चंद्र मज गगनात नाही भेटला
सूर्य गेला टाळुनी अजिबात नाही भेटला !

आंसवे माझी मला आधार माझा जाहली
एकही अपुलेपणाचा हात नाही भेटला

एकदा मज भेटल्या माझ्या तुझ्या पडसावल्या
चेहरा माझा तुझा त्यांच्यात नाही भेटला

हे निरर्थक शब्द माझे व्यर्थ मी गोंजारतो
अर्थही माझा मला इतक्यात नाही भेटला



## पोटुशी

बहरून आल्या गात्रामधुनी रक्त चंदनी गंध सुटे
नसानसातुन अमृतओल्या नक्षत्रांची लाट फुटे
हिरव्या बहरावरो पांगले मोर मनाचे स्वैर निळे
हिरवे हिरवे गंधघुमारे स्पंदनातुनी मोहरले.

चांदण भरल्या डोळ्याकाठी निळासावळा रंग नवा
स्वप्ने म्हणती दर्पणातला खट्याळ हट्टी चंद्र हवा
श्वासामधुनि नवजन्माचा कापूर आला दर्वळुनी
कंठामधले रेशीमपाणी क्षणभर गेले डुचमळुनी

डोळ्यामधुनि गूढ निळ्या त्या गाभाऱ्याचा नाद भरे
नाभिमधुनि सात जन्मीच्या पुण्याईचा चंद्र झरे
अंगांगातुन निळाईतली निळी कस्तुरी दरवळली
सचेत हिरव्या हुंकाराची जन्म पालवी सळसळली

रेशिमलेल्या स्तनाग्रातुनि पुनव केशरी पाझरते
यौवनातल्या सौरभातुनि कुणी पुरंध्री खुणावते !



## येरझारे

सुटून गेल्यावरी किनारे
कशास आले तुझे इशारे ?

तुझ्यामुळे लाजऱ्या सुखाचे
घरात आले वसंतवारे

रिता न झाला तुरुंग अजुनी
उठून गेले जरी पहारे !

दिशातुनी गुंजतील साऱ्या
कधीतरी आजचे पुकारे

दवारलेल्या फुलाफुलांतुन
तुझेच असतात येरझारे !



म. ठा. ग्रंथ संग्रहालय ठाणे
2802
दा. क्र 23856
काव्य गाधप3
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

## माणसे

ही अशी कोषात अपुल्या हिंडणारी माणसे
पाप पुण्यांच्या हिशेबी गुंतणारी माणसे

आखले वर्तुळ ह्यांनी हे घराच्या भोवती
फालतू संस्कार त्याला जागणारी माणसे

चेहरे आणि घरे सारेच शिसवीसारखे
दूर काचे आडुनी ही बोलणारी माणसे

धर्म आणि जात ह्यांचे वेध हयांना सर्वदा
फाटक्या पोथीत देवा शोधणारी माणसे

शब्द हयांचे पांगळे फिरतात वारे पाहुनी
ही अशी पाहून वारे वागणारी माणसे

चेहऱ्याची कात हयांच्या सांडते वरचेवरी
ही दुतोंडी, सर्पवंशी, दंशणारीं माणसे

## वृषाली

साताजन्माची पुण्याई
भाग्य मोहरून आले
सूर्य स्पर्शाच्या बाहूत
जन्म तेजाळून आले

सूर्य कवचाच्या काठी
हळू विस्कटे अंधार
मिठीमधुन थरथरे
भान सुटला शृंगार

निळी जांभळी कुंडले
गर्द श्वासात भिजली
कुणी स्वप्नाळू डोळचात
सूर्य तोरणे बांधली

आला पहाटवेळेला
सूर्य गंधाला बहर
एक जाहल्या मिठीत
सूर्य दंशाचे काहूर

जीव विरला तेजात
अंगअंग सूर्य झाले
तुळशिच्या पानावरी
सूर्य उतरून आले

## जन्म

किती जपायचे असे
नाही चुकणार वेळ
किती भरली तरीही
रिती होतेच ओंजळ

जन्म थकला भागला
असा जायचा सांडून
त्याला ओंजळीत पुन्हा
घे तू नव्याने भरून



## चेहरा

जरी न तू स्मरे तुझा अजून चेहरा
दिसे मला तुझा फुलांमधून चेहरा

अशी कशी विचारतेस आरशास तू
मिळेल कां मला तुझ्याकडून चेहरा ?

मनातला समुद्र त्यातली अथांगता
कळेल का कधी तुला कळून चेहरा !

उधार चेहरा कशास लावतोस तू ?
तुझ्याकडे खरा तुझा असून चेहरा

दिलीस रोज तू मला नवीन प्रेरणा
म्हणून ठेवतो तुझा जपून चेहरा

असा सदा सतेज राहणार हा किती ?
कधीतरी पडेल हा गळून चेहरा

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

## तारुण्य

हे दिवस तुझे आरशात बघण्याचे
पदराला सावरण्याचे ।।

रानातुन जातां जातां
पाखरांसवे बोलावे
कोमल हळुवार फुलांना
लाजून नांव सांगावे
हे दिवस तुझे मुक्तपणे फिरण्याचे
स्पर्शविण मोहरण्याचे ।।

एकेक सूर स्पर्शाचा
लागला जुळाया आता
आवाज तुला हृदयाचा
लागला कळाया आता
हे दिवस तुझे चांदण्यात झुरण्याचे
हळुवार प्रेम करण्याचे ।।

हलकेच तुझ्या डोळयांनी
उलगडला स्वप्नपिसारा
देहात मोकळा झाला
स्पर्शाचा खटयाळ वारा
हे दिवस तुझे रंग नवे भरण्याचे
स्वप्नांतुन वावरण्याचे ।।

## सूर

मी नवे सूर लाविले माझे
मी नवे गीत गायिले माझे

मी कुठे दूर एकटी आले
गांव मागेच राहिले माझे

साजणा, मी तुझ्याच साठी रे
आज घरदार सोडिले माझे

मी तुला काय आणखी देऊ ?
मी तुला गीतही दिले माझे

हासले लोक जे मला त्यांनी
रंग अजुनी न पाहिले माझे





## सारखे मस्तीत अपुल्या....

सारखे मस्तीत अपुल्या राहणे नाही बरे
सारखे एका दिशेने चालणे नाही बरे

मेघ ज्यांनी पावसाचा पाहिला नाही कधी
पावसाळी रंग त्यांना मागणे नाही बरे

पाहण्या आधी स्वतःचा चेहरा दिसतो कसा
चेहरा दुसऱ्या कुणाचा पाहणे नाही बरे

जे कधी मिळणार नाही सोड त्याचा नाद तू
सावली मागे स्वतःच्या धावणे नाही बरे

एकमेकांना असे कां एकटेपण लाभले
तू मला अन् मी तुला हे सांगणे नाही बरे

## दिंडी

व्यर्थ ही वाचाळ दिंडी पंढरीला चालली
सोवळच्या ह्या दांभिकांची फक्त गर्दी जाहली

जाहली ज्ञानेश्वरी पारायणे कित्येकदां
शब्द वारा होत गेले फक्त पाने संपली

दोंद सुटल्या सोवळ्यांची पालखीवर मालकी
काय ह्यांच्या जानव्याने संत ओवी जन्मली

बांधली सत्ताधिशांनी भव्य पूजा मंदिरी
मात्र भोळ्या भाविकांनी रांग नाही मोडली

जाहल्या वाऱ्या किती अन् पालख्या उठल्या किती !
अमृताशी पैज यांनी ना कधीही लावली

ह्या रूढीच्या पावलांना टाळ चिपळ्या सांगती
भक्तिला एकात्मतेची जोड नाही लाभली



## तडजोड

कोण स्वप्नांतुन माझ्या पाहुनी गेले मला ?
रंग हळदीच्या फुलांचा लावुनी गेले मला

पाहिली आजन्म ज्यांची वाट अंधारात मी
ते सुखाचे काजवेही चावुनी गेले मला

दीप माझ्या अंतरीचा विझवुनी गेलास तू
सावल्यांचे खेळ मागे राहुनी गेले मला

रोज आयुष्यासवे तडजोड मी केली तरी
शेवटी आयुष्य माझे जाळुनी गेले मला

## अनुभव

घेतलेल्या अनुभवातुन
काय ते समजून घ्यावे
पोळल्यावर ओठ साधे
ताकही फुंकून प्यावे

पाहिला नाहीस अजुनी
पेटलेला काजवा तू
एव्हढ्यातच तू कशाला
सूर्य हाताशी धरावे ?

रोज माझ्या आसवांना
मी किती द्यावा दिलासा
रोज त्यांचे चोचले मी
कोठवर पुरवीत जावे ?

का असा वेळी अवेळी
मेघ ओथंबून यावा,
का असे वेळी अवेळी
वेदनांनी मोहरावे ?

ह्या अशा एकांतवेळी
बोल ना काहीतरी तू,
मी असे का एकट्याने
तारकांना बोलवावे !



## रानात

रानात
निळ्या पाण्यात
सांज गाण्यात लाट थरथरली
पैंजणे
हळु चुंबित
भाव फुलवित जळी विरघळली

बिलगली
रात्र नेत्रांत
तिच्या वक्षात चांदणे फुलले
आभाळ
निळ्या पाण्यात
सांजगाण्यात हरवुनी गेले

## चाहूल

हया शुभ्र चांदण्याची जादू हवेत आहे
अन् चंद्र भारलेला माझ्या कवेत आहे

स्वप्नात काल माझ्या मी पाहिले असे की
माणूस माणसाला आवाज देत आहे

आमंत्रणे सुखाची देतेस तू कशाला ?
माझ्या व्यथांसवे मी आता मजेत आहे

माझ्या घराकडे मी जाते निघून आता
अंधार भोवतीचा उजळून येत आहे

हया वृद्ध सांजवेळी चाहूल ही कुणाची ?
आयुष्य आज माझे ताब्यात घेत आहे



## उमाळा

मला फक्त माझा उमाळा म्हणाला–
"असा एकटा तू कुठे रे निघाला ?"

किनारा तुला मी कसा काय देऊ !
मला वारसा वादळाचा मिळाला

निघाल्यावरी सावली दूर माझी
सुखाने मला बोलवावे कशाला ?

कळे ना कशी लागली आज तंद्री
दिली हाक मी आज माझ्या मनाला

सखे ये, फुलांच्या प्रदेशात जाऊ
जिथे गंध येई मुक्या यौवनाला

## साजणा रुसलास का रे !

हया अशा एकांत वेळी बोल ना काही तरी
साजणा रुसलास का रे ? तू असा माझ्यावरी

एकटी माझ्यासवे मी मोहराया लागले
तारकांच्या चाहुलीतुन वावराया लागले

वाजते प्राणात माझ्या स्पंदनांची बासरी

उमलुनी केव्हाच माझे स्पर्श झाले मोकळे
मोकळया स्पर्शात माझा जीव एकाकी जळे

सोहळे दीपोत्सवाचे पेटले माझ्या उरी !

## स्नेहाळ

लोक आता बोलवाया लागले
आर्जवे माझी कराया लागले

कोणती जादू अशी केलीस की
मी तुला माझा म्हणाया लागले

जीवनाने प्रश्न जे केले मला
आसवांना सोडवाया लागले

हे कुणाचे ओठ माझ्या लोचनी !
रंग स्वप्नांचे भराया लागले

जाऊ दे आता मला माझ्या घरी
दूर तारे मावळाया लागले

रोजच्या स्नेहाळ सहवासातुनी
रेशमी नाते जुळाया लागले

लोक हे साध्यासुध्या वस्तीतले
गीत माझे गुणगुणाया लागले





## अजून कोठे पहाट झाली !

पहा नभी मंदमंद तारे अजून कोठे पहाट झाली
अजून माझ्या समोर गा रे अजून कोठे पहाट झाली !

तुझ्या मिठीच्या समुद्रलाटा अशा कशा ओसरून गेल्या
भिजव मनाचे पुन्हा किनारे अजून कोठे पहाट झाली !

निवांत गावावरी अजुनही उभा दिव्यांचा खडा पहारा
असा निघाला मधेच का रे ? अजून कोठे पहाट झाली !

मनातल्या पाकळ्या गुलाबी अजूनही मोकळ्या न झाल्या
कवेत घे तू मला पुन्हा रे अजून कोठे पहाट झाली !

लपेटुनी घेतल्यावरी मी नव्या सुखाचा पहाटवारा
तुझ्या घरी तू निघून जा रे अजून कोठे पहाट झाली !

## आभाळ दूर कलताना

आभाळ दूर कलताना
येतात कुणाची गाणी,
का ओठांवरती माझ्या
गहिवरते एक विराणी ?

आभाळ दूर कलताना
तो तुझा किनारा दिसतो
भरतीच्या लाटेपरी मी
उसळून पुन्हा ओसरतो

आभाळ दूर कलताना
वाटते पुन्हा तू यावे
अनिवार चांदणे माझे
तू पुन्हा लपेटुन घ्यावे

आभाळ दूर कलताना
मोडके दार कुरकुरते
दारास मोडक्या माझ्या
पण खरेच कविता कळते

आभाळ दूर कलताना
मी वाट पाहतो अजुनी
सोडून लोक जे गेले
येतील कदाचित वळुनी



## निर्वाण

सूर्य बुडता आंधळ्या पाण्यात बुडली सावली
प्राण कासावीस त्याची ज्योतही मंदावली

हा निळा अभिसार गगनी जीव पाहे विर्घळू
राहिलेले उन्ह थोडे लागले आता ढळू

थांबला तीरावरी वारा तटस्थासारखा
बोलवे पाण्यातुनी कोणी विरागी तारका

चंदनाचा गंध रक्तातून आला वाहुनी
लाख जन्मांचे दिवे तेजाळले प्राणातुनी

धूळ झाली पाऊले पारा उडे क्षितिजावरी
प्राक्तनाच्या मैफिलीचा नाद ये वाऱ्यावरी

झाकताना लोचने आभाळ थोडे वाकले
बहरुनी थोडी फुले बहरून कोणी चालले

## जवळीक

नाही म्हणावयाला इतके घडून गेले
कुठल्यातरी क्षणाला मी मोहरून गेले

दारात यौवनाच्या पाऊल ठेवता मी
कित्येक काळजांचे ठोके चुकून गेले

होते सभोवताली जे लोक ओळखीचे
माझ्या पराभवाची चर्चा करून गेले

माझ्यासमोर येता एकेक सूर माझा
अपसूक ओठ माझे गाणे म्हणून गेले

त्या कोंवळचा क्षणाशी जवळीक साधताना
माझे तुझ्या मनाशी नाते जुळून गेले

माझ्याशिवाय येथे नाही कुणी तरीही
हलकेच कोण माझे डोळे पुसून गेले ?

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२८६२
दा. क. २३८५६
काव्य
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

## रंग

पाऊले रक्ताळली ही चालणे सरणार केव्हा ?
सांग आयुष्या सुखाचा चेहरा दिसणार केव्हा ?

माणसाने कोरलेल्या देखण्या ह्या देवतांना
फाटलेल्या काळजाचा हुंदका कळणार केव्हा ?

कोंडलेला श्वास माझा सारखा किंचाळतो की—
“ मोकळी ताजी हवा शहरास या मिळणार केव्हा ?”

ही अशी शतकानुशतके चालली अंधार—यात्रा
आंधळा अंधार इथला शेवटी विरणार केव्हा ?

आत्मकेंद्रित कल्पनेला एकदा कविता म्हणाली—
“ अक्षरातुन वेगळाले रंग तू भरणार केव्हा ?”

## काजवा

रात्रभर धुंद गारवा होता
साजणा, काल तू हवा होता

कालची रात्रही नवी होती
कालचा चंद्रही नवा होता

आपुल्या बंधमुक्त प्रेमाचा
सर्व गावात गवगवा होता

बंद खोलीत चांदण्याराती
बाहुपाशात चांदवा होता

शोधते मी खुणा तुझ्या माझ्या
पाखरांचा जिथे थवा होता

राहिले फक्त सांगण्यासाठी
एकमेकांमधे दुवा होता

सूर्य समजून भेटलो ज्याला
तो दिशाहीन काजवा होता



## सांगू कसे तुला मी...

सांगू कसे तुला मी माझ्या मनातले ग ऽ
नाते मला कळाले माझ्या तुझ्यातले ग ऽ

कानात सांग माझ्या हलकेच नाव आता
केव्हाच पाखरांचे आवाज थांबले ग ऽ

डोळ्यांत लाजणाऱ्या लपून घे मला तू
दारात चांदण्याचे पाऊल वाजले ग ऽ

ये ना मिठीत माझ्या का लाजतेस आता !
देहात अमृताचे आभाळ सांडले ग ऽ

## जोगवा

पहाटवेळी जेव्हा
तारकांचे आवाज बुडत जातात
मोकळ्या मिठीतून
पाखरांचे थवे भिरभिरत जातात

रंग उडालेल्या स्वप्नांची
साठवण करताना
माझ्या पापणीवर
संध्याकाळची उन्हे उतरत जातात

आभाळभर
हिरव्या ऋतूचे गाणे बहरते तेव्हा
तुझे माझे पावसाळी दिवस
डोळ्यांपुढून सरकत जातात

अधूनमधून
तुला दिलेल्या कवितेच्या ओळी आठवताना
माझ्या शेजारून
ओळखीचे सुगंध दरवळत जातात

तुझ्या माझ्या सावल्या
एकमेकींना जोगवा मागतात तेव्हा
परस्परांच्या हातातुन
संध्याकाळच्या वेळा घरंगळत जातात



## राधा

दूर रानातून हलके बासरीचा सूर आला
कृष्णवेड्या राधिकेचा देह सारा कृष्ण झाला

लागली चाहूल जेव्हा राधिकेच्या पावलांची
आसमंतातून साऱ्या सूर मुरलीचा निघाला

कृष्णरंगी रंगल्यावर सांगते कृष्णास राधा–
"आज आपोआप मजला अर्थ प्रेमाचा कळाला"

मीपणाच्या बंधनाची बंधने जेव्हा गळाली
राधिकेच्या लोचनातून जन्म कृष्णाचा बुडाला

सैल होणाऱ्या मिठीचा थांबला आवेग जेव्हा–
शांत यमुनेचा किनारा सावळ्या रंगात न्हाला

## हळूच लाजुनी

हळूच लाजुनी हसून पाहणे
बरे न हे असे खटयाळ वागणे

कधीच संपला अजाणतेपणा
शिकून घे अता जपून चालणे

दिशा–दिशातुनी भरून राहिले
विजेसमान हे तुझे लकाकणे

अजून कोवळया कळीसमान तू
हळूच घे जरा टिपून चांदणे



## कलंदर

एक वेडा गीत त्याचे एकटा गाऊन गेला
अंतरीच्या वेदनांचा खेळ तो मांडून गेला

कोण तो कोठून आला समजले नाही कुणाला
सांडता आयुष्य सारे त्यासवे सांडून गेला

सांडता आयुष्य सारे तो इथे झाला रिकामा
प्राक्तनाच्या क्रूरतेचा डाव तो उधळून गेला

जीवनाच्या सांजवेळी गीत गाताना फुलांचे
काळजातुन अस्मितेचा सूर्य तो माळून गेला

## ऋतू

मी तुझ्या नजरेत हळवे
आपुलेपण पाहिले
लाजणाऱ्या भावनांचे
वेगळेपण पाहिले

आज तारुण्यास माझ्या
लाभला कुठला ऋतू ?
अंगप्रत्यंगात माझ्या
मी नवेपण पाहिले

काल जेथे माणसांची
सारखी ये जा असे
त्या हवेलीतून आता
मी सुनेपण पाहिले

तू नको इतक्यात समजू
समजली कविता तुला
तू कुठे अजुनी तिच्यातिल
एकटेपण पाहिले

## बाजी

खोकताना बाप मेला माय आजारात गेली
घेऊनी देहास अपुल्या लेक बाजारात गेली

तीन दगडांच्या चुलीवर मांडला संसार ज्यांनी
वेदनेची भीक त्यांच्या सारखी दारात गेली

सांग तू इतकेच मजला पंढरीच्या पांडुरंगा
मूठभर ही माणसे का थेट गाभाऱ्यात गेली ?

समजुनी घे चाल आधी उचल मग प्यादे तुझे तू
नाहीतर म्हणशील बाजी आज हातोहात गेली

ह्या सुखासिन दु:खितांनी घेतल्या कवितेस टाळ्या
जे खरे दु:खित त्यांची हाक अंधारात गेली

जाळल्यावर प्रीतिच्या वणव्यात मी आयुष्य माझे
आज शेजारून माझ्या चांदण्याची रात गेली



## हंस

आभाळ वाकताच एक हंस हिंडतो
कोणास कोठले अनाम गीत मागतो ?

पाण्यात सांजसावल्या हळूच लोपता
काठावरील स्पंदने तमात शोधतो

रानास रानभूल हूल देऊ लागता
कैफात त्या भुलीत एकटाच दंगतो

दूरात शुक्र मंदमंद होऊ लागता
रानात त्या खुणा फुलाफुलात पाहतो

होताच वाट झुंजुमुंजु मंद केशरी
पंखास आवरून एक अश्रू गाळतो.


ANIL81

## कधीकधी

दुरून चेहरा तुझा खुणावतो कधीकधी
मनातल्या मनात मी शहारतो कधीकधी

अजून सावली तुझी मला चुकून भेटते
अजून नाव मी तिला विचारतो कधीकधी

चुकून मैफिलीत नाव काढता तुझे कुणी
असाच आसवांत खोल हासतो कधीकधी

अता न राहिली मिठीत वीज पावसातली
अजून एकटाच मी झळाळतो कधीकधी

कळे न कोण लोक हे घरापुढून चालले ?
कळे न मी कुणास हाक मारतो कधीकधी

## ये मिठीत बावरू नको

ये मिठीत बावरू नको
एकटीच मोहरू नको

लागली फुलावयास तू
एकटी अशी फिरू नको

हा वसंत स्पंदनातला
एवढ्यात आवरू नको

मंद होऊ देत तारका
थांब, जायचे करू नको

लाजुनी हळूच तू अशी
चांदरात सावरू नको



## साक्ष

आज एकांतात हळवी वेदना गंधीत झाली
अंगप्रत्यंगात हलके चांदण्याची हाक आली

आर्जवी डोळयांत माझे गीत रेंगाळून होते
त्याच डोळी हळदगोरी रात्र शृंगारात न्हाली

मी मुक्या ओठात शब्दांच्या हवेल्या बांधल्या
ओठ खुलता हाक माझी माझिया ओठी बुडाली

ती दिवा विझवून होती मी पहाटे जागताना
ठेऊनी ओळी दिव्यांच्या ती पुढे मार्गस्थ झाली

एकदा हिरव्या ऋतूचा बहर स्वप्नातून आला
हरवल्या दिवसांस माझ्या साक्ष कवितेची मिळाली

## कहाणी

सांगताना मी तुला माझी कहाणी
का असे आले तुझ्या डोळ्यांत पाणी ?

कालच्या माझ्या तुझ्या हिरव्या ऋतूची
राहिली नाही कुठे साधी निशाणी

ज्या क्षणी येतेस तू स्वप्नात माझ्या
मोहराया लागते ही रातराणी

सोबतीला तू जरी नाहीस आता
ओठ का अजुनी तुझी गातात गाणी ?



## अजून काही वेळ तू....

अजून काही वेळ तू नकोस जाऊ साजणा !

अता कुठे मनातले मनास लागले कळू
तुझ्यासवे तुझ्यात मी हळूच लागले ढळू
पुकारतो पुन्हा पुन्हा मला वसंत पाहुणा ।।

फुलांत भोवतालच्या अजून चांदणे झुले
टिपून घ्यायचे किती अजून जन्म राहिले
अजून दे सख्या मला तुझ्या पहाटच्या खुणा ।।

## ओळ

सांजरंगात
कुठे दूर
दिशा बुडताना,

शब्द येतात
मला साथ
करायासाठी !

आणि हळुवार
अशी ओळ
मला सुचताना,

ओठ हलतात
तुझे गीत
म्हणायासाठी !

## निळे चैतन्य

काळ्या पाण्यात घटनक्षीचा
तटी चांदवा गोऱ्या रंगाचा

गार गवत रूमझुमते
अंगबिलोरी हळू चुंबिते

जळी उतरे गोरी गौळण
निळी सावली दबा धरून

निळे चैतन्य काळ्या पाण्यात
लाज डोळ्यांत कंप उरात

निळी जाहली गौरी गौळण
निळ्या दंशाचे ओठी गोंदण

घुमे पारवा दूर रानात
निळा प्रकाश रुजे गर्भात

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२७०२
दा. क्र. २३८५६
REFBK-0023856
REFBK-0023856



## दुवा

तू फुले आणू नको आता दुवा जुळणार नाही
आसवांना सारखे समजावणे जमणार नाही

घे लपेटुन एकदा तू चांदण्याची आग सारी
त्याविना जळण्यातले जगणे तुला कळणार नाही

लावुनी माझ्या उशाशी सांज शकुनाचा दिवा तू
हात दे हातात माझ्या मी उद्या असणार नाही

भेटलो होतो जिथे तेथे मला शोधू नको तू
मूठभर माझ्या चितेची राखही मिळणार नाही

अस्मितेने आपुल्या तू सूर्य हो तेजाळणारा
माणसांच्या काळजातुन जो कधी ढळणार नाही

व्यर्थ का खोटया यशाची मी फुले गोळा करावी
सांजवेळी ओळखीचा शब्दही उरणार नाही